# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १५० वा रविवार दि.२४ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.








**निलंगा विधानसभेवर पुन्हा निलंगेकर विजय**

# संभाजीराव पाटील निलंगेकर यांची विजयाची हॅट्रिक ;१३ हजार ७४० मतानी विजयी, निलंग्यात जल्लोष

निलंगा ; निलंगा विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर हे १३ हजार ७४० मतांनी विजयी झाले. तर काँग्रेसचे प्रतिस्पर्धी अभय साळुंके ९८ हजार ६२८ मताधिक्य घेऊन द्वितीय क्रमांकावर राहिले. तर वंचितचे मंजुषा निंबाळकर तिन हजार ८९८ मते घेत तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या. यामुळे निलंग्यात पुन्हा कमळ फुलले आहे. माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी विजयाची हॅट्रिक साधली आहे. निलंगा विधानसभा मतदारसंघात झालेल्या अटीतटीच्या निवडणुकीत अभय साळुंकेचा जरी पराभव झाला असला तरी त्यांनी ९८ हजार ६२८ आपल्या पारड्यात मते पाडून घेत-ले. तर आकाश पाटील ९७९ ,ज्ञानेश्वर कांबळे ८०४ ,नागनाथ बोडके १३८८ , हनुमंत धानुरे ४३० , अन्वर हुसेन सय्यद ७९ , दत्तात्रय सूर्यवंशी १८६ , दत्तात्रय सूर्यवंशी १०३ , निळकंठ बिरादार १९८, फैज मिया शेख ६०३ , मेहबूब पाशा मुल्ला २९४ मते मिळाली. तर नोटाला ९१५ मते पडली आहेत. असे एकूण २ लाख १७ हजार २३८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. यात भाजपाचे माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांना १लाख १२ हजार ३६८ मते पडल्याने त्यांचा १३ हजार ७४० मतांनी विजयी झाले. विजयानंतर कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष करत चौका चौकात फटाक्याची आतषबाजी करत गुलाल उधळून पेढे वाटत आनंद साजरा केला. औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथून युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीत शहरामध्ये विजय जल्लोष साजरा करण्यात आला ग्रामीण भागातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात या जल्लोष मध्ये हातात भारतीय जनता पार्टीचे झेंडे घेऊन सहभागी झाले होते. पहिल्या फेरीपासूनच माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांना मताधिक्याची लीड मिळत होती. यामध्ये निलंगा शहर व मतदार संघातील मोठे गावांमध्ये फारशी मताधिक्य मिळाले नाही. निलंगा विधानसभा मतदारसंघात चौथ्यांदा माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर विजयी झाले तर तिसऱ्यांदा विजयी होऊन त्यांनी विजयाची हॅट्रिक साधली आहे. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीला प्रारंभ झाला होता प्रारंभी पोस्टल मताची मोजणी झाली निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके यांनी संभाजी पाटील निलंगेकर हे विजयी झाल्याचे घोषित केले.

# शांत, सुरक्षीत, प्रगतीशील लातूरसाठी लातूरकरांचा कौल सर्वांचा विश्वास सार्थ ठरवेन-आ अमित देशमुख



लातूर / प्रतिनीधी :- शांत, सुरंक्षीत, सामाजिक सलोख्याच्या प्रगतीशील लातूरसाठी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी मला कौल दिला आहे. त्याचा नम्रतापूर्वक स्विकार करीत असून तमाम लातूरकरांच्या विश्वासाला पात्र रहाण्याचा प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रीया राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री महाविकास आघाडी, काँग्रेस पक्षाचे विजयी उमेदवार आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. ला-तूर शहर मतदारसंघात विजयी मिळवल्यानंतर बोलतांना आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे की, एकूण प्रचार काळात लातूरला शांत, सुरंक्षीत आणि प्रगतीशील ठेवण्याचे त्यांच बरोबर येथील सामाजिक सलोखा अबाधित राखण्यासाठी प्रयत्नशील रहण्याचे आश्वासन आम्ही काँग्रेस महाविकास आघाडीच्या जाहीरनामातून दिले होते. या आश्वासनाला लातूरकरांनी कौल दिला आहे याची मला जाणीव आहे. त्यामुळे दिलेल्या आश्वासनाला बांधील राहून लातूरला कायम प्रगतीपथावर ठेवण्यासाठी भविष्यात मी कायम प्रयतनशील राहणार आहे.या मतदारसंघातील हा विजय सकारात्मक प्रचाराचा, सत्याचा, संवीधानाचा आणि लोकशाहीचा विजय आहे असे मी मानतो. महाविकास आघाडी व काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी घेतलेल्या परिश्रमाचा, हितचिंतकांनी दिलेल्या पाठींब्याचा हा विजय आहे असे मी मानतो, त्यामुळे या सर्वासोबतच लातूरच्या सर्व जनतेचे मी आभार मानतो आहे, असे आमदार देशमुख यांनी म्हटले आहे. माझा शहर मतदारसंघात विजय झाला असला तरी लातूर ग्रामिण तसेच अनेक मतदारसंघात आपणाला अपेक्षित यश मिळाले नाही त्यामुळे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नाउमेद होऊ नये, आपण त्या ठिकाणी पून्हा लढू आणि जिंकू, असा विश्वास आमदार अमित देशमुख यांनी शेवटी व्यक्त केला आहे.

# हा विजय जनतेला व कार्यकर्त्यांना समर्पित - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर



निलंगा: निलंगा मतदार संघातील निलंग्यासह देवणी व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील नागरिक व मतदारांनी माझ्यावर विश्वास दाखवत मला चौथ्यांदा विधानसभा निवडणुकीत विजयी केले.या विजयासाठी मतदारसंघातील नागरिक व भाजपा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.हा विजय मी त्यांनाच समर्पित करतो,अशी भावना निलंगा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केली.

ही निवडणूक सोपी नव्हती. बाभळगावकर मंडळींनी मागील वर्षभर निलंग्यासह जिल्ह्यात अपप्रचार करत दिशाभूल चालवली होती.जनता त्या अपप्रचाराला भुलली नाही.महायुतीवर विश्वास व्यक्त करत जिल्ह्यातील सहापैकी पाच जागी महायुतीला मतदारांनी विजयी केले.हे संपूर्ण यश मतदार संघातील व जिल्ह्यातील जनता आणि कार्यकर्त्यांचे आहे.जनतेने विकासाला पाठबळ दिले.



# आ. रमेश अप्पा कराड यांचा दणदणीत विजय




लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टी व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांचा दणदणीत विजय झाला या विजयाचा महायुतीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्याची अतिषबाजी करत विजयाचा मोठ्या जल्लोषात आनंद व्यक्त केला.




दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# आशेचा किरण

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशाच्या कारागृहांमध्ये बंदिस्त असणार्या अंडरट्रायल (विचारधीन) कैद्यांपैकी एक तृतीयांश शिक्षा भोगलेल्या सर्व कैद्यांना संविधान दिनापूर्वी न्याय मिळेल, अशी घोषणा केली आहे. देशातील तुरुंगांमध्ये एकूण ५ लाख ५४ हजार ३४ कैदी असून, यापैकी ४ लाख २७ हजार १६५ कैदी हे अंडरट्रायल आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी जलद करतानाच प्रणालीगत अडथळे दूर करण्यासाठी न्यायव्यवस्था, कायदा अंमलबजावणी संस्था आणि नागरी समाजाच्या प्रतिनिधींनी एकत्र काम केले पाहिजे.

भारतीय तुरुंगांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी आहेत, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. यापैकी ७५ टक्के कैद्यांची सुनावणी सुरू आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांनी २६ नोव्हेंबर या संविधानदिनापर्यंत जास्तीत जास्त एक तृतीयांश शिक्षा भोगलेल्या कैद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे. ही घोषणा स्वागतार्ह आहे; पण न्याय सुनिश्चित करण्यासाठी आव्हाने खूप मोठी आहेत. भारतीय नागरी संरक्षण संहितेच्या कलम ४७९ सारख्या अलीकडील कायदेविषयक सुधारणा असूनही प्रणालीगत विसंगती कायम आहेत. विचाराधीन किंवा अंडरट्रायल कैद्यांची सुटका जलद करण्याच्या सुप्रीम कोर्टाच्या भूमिकेने एका जटिल समस्येकडे लक्ष देण्याची गरज अधोरेखित केली आहे. प्रत्यक्षात नोकरशाहीच्या संथ कारभारामुळे कारागृहात बंदिस्त कैद्यांची सुटका होण्यास विलंब होत आहे. त्यामुळेच गरीब कैद्यांसाठी आर्थिक मदतीची तरतुदीसारख्या आश्वासक योजना असूनही अंमलबजावणीत विसंगती कायम आहे. त्यामुळे तुरुंगात मोठ्या प्रमाणात अंडरट्रायल कैदी खितपत पडलेले आहेत. या समस्येचे मूळ गुन्हेगारी न्याय व्यवस्थेत आहे, जी सुधारात्मक आणि पुनर्वसनाच्या प्राधान्याने न्याय देण्याऐवजी दंडात्मक उपायांना प्राधान्य देते. जामिनासंदर्भातील अटी उदार करण्यासाठी न्यायालयीन संकोच, पात्र कैद्यांची ओळख पटवण्यामध्ये पद्धतशीर विलंब समस्या जटिल करते. दुसरीकडे विधी सेवा प्राधिकरणापेक्षा जिल्हाधिकार्यांवर ही योजना अवलंबून राहिल्याने या प्राधान्याला दुय्यम बनवले आहे.

तुरुंगांमधील कैद्यांची गर्दी कमी करण्यासाठी देशाला वेगळा विचार करण्याची गरज आहे. न्याय सुनिश्चित करण्यासाठी या उपक्रमात सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश करताना पुनरावलोकन समित्यांद्वारे ओळख आणि सोडण्याची प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या २०२२ च्या अहवालानुसार, देशातील तुरुंगांमध्ये एकूण ५ लाख ५४ हजार ३४ कैदी असून, यापैकी ७७.२ टक्के म्हणजेच ४ लाख २७ हजार १६५ कैदी हे अंडरट्रायल आहेत. आर्थिक स्थितीनुसार विश्लेषण केल्यास ६९.८ टक्के कैदी गरिबी रेषेखालील, २५.२ टक्के मध्यम, तर केवळ ५ टक्के उच्चवर्गीय आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने केलेल्या महत्त्वपूर्ण घोषणेमुळे आशेचा किरण दिसू लागला आहे. या नव्या उपक्रमामुळे सुमारे १ लाख ४५ हजार कैद्यांना मदत होऊ शकते.

# अपक्षांच्या पाठींब्याची गरज?

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेसाठी ६५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले. मतदान संपल्याबरोबर विविध वाहिन्यांचे, वृत्तवाहिन्यांचे एक्झिट पोलचे सर्व्हे जाहीर होण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्र राज्याची विधानसभेची लढत प्रामुख्याने महाविकास आघाडी आणि महायुतीतच झाली. बसपा, सपा, मनसे, बच्चू कडूंचा प्रहार, स्वाभिमानी, स्वराज्य, वंचित बहुजन आघाडी अशा विविध लहान-मोठ्या पक्षांनीदेखील निवडणुकीत आपले उमेदवार उभे केले होते. सध्याचे राजकीय वातावरण पाहता कोणत्याही एका पक्षाला लोकसभा निवडणुकीत अथवा त्या त्या राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत स्वबळावर बहुमत मिळविणे अवघड आहे. त्यामुळे युती, आघाड्या करून सत्ता मिळविणे अथवा सत्तेच्या जवळपास जाणे शक्य होत असते. महाराष्ट्रातही महायुतीमध्ये भाजपा, शिंदे गटाची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी या तीन प्रमुख पक्षांचा समावेश आहे. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी, उद्धव ठाकरेंची शिवसेना या तीन पक्षांचा समावेश आहे. महाविकास आघाडी व महायुतीमध्ये अन्य लहान-मोठ्या सहयोगी पक्षांचा समावेश आहे. एक्झिट पोलच्या सर्व्हेमध्ये राज्यामध्ये पुन्हा महायुती सत्तेवर येणार असल्याचा दावा केला जात आहे. एक- दोन सर्व्हेमध्ये महाविकास आघाडीची सत्ता येणार असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे नक्की सत्ता कोणाची येणार, कोणाचे किती आमदार निवडून येणार, हे शनिवारीच स्पष्ट होणार. एक्झिट पोलचा सर्व्हे म्हणजे निवडणूक निकाल नव्हे, तो एक अंदाज असतो. अनेकदा सर्व्हे खरे, तर अनेकदा खोटेही ठरतात. मागे झालेल्या जम्मू-काश्मीर व हरियाणाच्या निवडणुकीमध्ये जम्मू-काश्मीरमध्ये भाजपाची तर हरियाणामध्ये काँग्रेसची सत्ता येणार असल्याचा दावा एक्झिट पोलने केला होता. मात्र निवडणूक निकाल लागल्यावर सर्व्हे खोटे असल्याचे उघड झाले. हरियाणामध्ये भाजपाची सत्ता आली, तर जम्मू-काश्मीरची सत्ता भाजपाला मिळाली नाही. त्यामुळे सर्व्हेचे अंदाज काहीही सांगत असले तरी प्रत्यक्षात वस्तुस्थिती शनिवारी स्पष्ट होणार.

मागील विधानसभा निवडणूक निकालानंतर घडलेल्या राजकीय घडामोडी पाहता महाविकास आघाडीतील एक घटक आणि महायुतीमधील एक घटक एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याची शक्यताही राजकीय क्षेत्रांत व्यक्त केली जात आहे. कोणाचे किती आमदार जास्त निवडून येतात आणि मुख्यमंत्री पद मिळविण्यासाठी कोण किती महत्त्वाकांक्षी आहे, यावरही सत्तेची समीकरणे बदलू शकतात. निवडणुका लढेपर्यंत एकत्र असणारे पक्ष मतमोजणीनंतर सत्तासंपादन करताना एकत्र असतीलच याची कोणी खात्री देऊ शकत नाही. मागील सभागृहाने तीन राज्य सरकारे पाहिली आहेत. त्यामुळे आज आपल्यासोबत असणारा उद्या असेलच याची खात्री देता येत नाही. २०१९ सालची निवडणूक भाजपा आणि तत्कालीन एकसंध शिवसेनेने एकत्र लढविली. काँग्रेस-राष्ट्रवादीने निवडणूक एकत्रित लढविली; परंतु निकाल लागताच शिवसेनेने मुख्यमंत्री पदाचा दावा केल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या नेतृत्वाखाली भाजपाच्या देवेंद्र फडणवीसांसोबत सत्तेमध्ये सहभागी झाली. त्यानंतर शरद पवारांनी अशा सरकारविषयी नाराजी व्यक्त करताच अजित पवार बॅकफूटवर आले. त्यानंतर शिवसेनेने सत्तेसाठी व मुख्यमंत्रीपदासाठी भाजपाची साथ सोडत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची संगत धरत महाविकास आघाडीची सत्ता आली. पुढे एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंड करत सत्तेतून बाहेर आले. यावेळी अपक्ष १० आमदारांनीही त्यांना साथ दिली. त्यामुळे शिंदे-फडणवीसांचे सरकार सत्तेवर आले.



मागील पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्रीय जनतेने तीन सरकारे पाहिली. तीन सरकारमध्ये काही मंत्र्यांचे चेहरे मात्र कायम राहिल्याने सरकारे याच लोकांसाठी बदलली आहेत काय, असा उपहासात्मक प्रश्नही राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे. एक्झिट पोलने महायुतीचे सरकार सत्तेवर येणार असल्याचे आणि महाविकास आघाडीला सत्ता मिळणार नसल्याचे संकेत देऊनही महायुतीकडून जल्लोष साजरा केला जात नाही आणि महाआघाडीकडे निराशा पसरलेली नाही. जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांतील विधानसभा निवडणूक निकालांबाबतच्या एक्झिट पोलच्या सर्व्हेबाबत उलटेच फासे पडल्याने महाविकास आघाडी व महायुती सर्वेच्या अंदाजाकडे फारशा गांभीर्याने पाहत नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे महिला वर्गाचे मतदान महायुतीलाच झाले असल्याचे महायुतीकडून सांगण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षांनी दिलेले उमेदवारही महत्त्वाचे असतात. अलीकडच्या काळात पक्षाला पाहून मतदान करण्याचे दिवस इतिहासजमा झाले. त्यामुळे चांगले उमेदवार देणे, हा त्या पक्षांसाठी मतदारसंघामध्ये जमेची बाजू ठरणार आहे.

बुधवारी मतदान संपले. शनिवारी मतमोजणी होणार आहे. उमेदवारांनी मतदारसंघामध्ये २० ते २२ दिवस जंग जंग पछाडले होते. मतदारसंघातल्या प्रत्येक मतदारांशी संपर्क व सुसंवाद साधण्यासाठी जीवाचे रान केले होते. मात्र मतदान संपताच अवघ्या काही मिनिटांमध्ये एक्झिट पोलचे निकाल जाहीर होत असतात. पक्ष, उमेदवार, कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मतदान संपल्यावर अंदाज बांधण्यासाठी एक-दोन तासांचा कालावधी जातो. मतदारसंघातील प्रत्येक यादीचा अंदाज घेऊन निकालाबाबतचा संभाव्य अंदाज बांधला जातो. ज्यांनी मतदान प्रक्रिया राबविताना मतदारांशी संपर्क केला, त्यांना काही अवधी लागतो. मात्र निवडणूक निकालाबाबत सर्व्हे जाहीर करणारे घटक मात्र अवघ्या काही सेकदांमध्ये कसा अंदाज व्यक्त करू शकतात? याबाबत गौडबंगाल कायम आहे. मतदान झाले आणि सआता निकाल येणे बाकी असल्याने निवडणूक लढविणारे घटक व त्यांचे कार्यकर्ते गॅस'वर आहेत. निकाल जाहीर होण्यास अजून काही तासांचा कालावधी असला तरी निकालाबाबत सर्वांना कमालीची उत्सुकता लागून राहिली आहे. त्यातच बहुमतापासून काही पावलांवर समीकरणे अडखळल्याने सत्ता स्थापनेसाठी अपक्षांची रसद आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे निवडून येण्याची शक्यता असलेल्या अपक्ष उमेदवारांशी संपर्क साधण्यास महाविकास आघाडीच्या तसेच महायुतीच्या घटकांनी सुरुवात केली आहे. निवडणूक निकाल लागण्यापूर्वी मतदारसंघातील आघाडीवरूनच सत्ता संपादनाचा कल स्पष्ट होणार आहे. सत्तेबाबत महाविकास आघाडी व महायुती दोघेही आशावादी आहेत. अपक्षांच्या पाठिंब्याची गरज लागल्यास त्यांचीही दोन्ही घटकांना मनधरणी करावी लागणार आहे.

# कोलेस्ट्रॉल राहील नियंत्रणात, प्या या मसाल्याचे ज्युस, किती आणि कधी प्यावे?

बहुतेक लोक चहामध्ये आले मिक्स करून पितात. पण आज आम्ही तुम्हाला आल्याद्वारे कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्याचा एक खास उपाय सांगणार आहोत. आल्याचा ज्युस आणेल कोलेस्ट्रॉल नियंत्रणात



आल्याचा वापर हिवाळ्यात जेवणात करणे फायदेशीर ठरते. लोकांना आल्याचा चहा प्यायला आवडतो. पण आल्याचा रस पिण्याचेही अनेक फायदे आहेत. शरीरात जमा झालेले खराब कोलेस्टेरॉल आल्याच्या रसाने कमी करता येते. जाणून घ्या किती प्रमाणात आल्याचा रस प्यावा. आलं हे आयुर्वेदात अद्भुत औषध मानले जाते. आयुर्वेदिक डॉक्टर माधव भागवत यांनी आल्याच्या रसाचे कोलेस्ट्रॉलसाठी काय फायदे होतात याबाबत सांगितले आहे. (फोटो सौजन्य - )

आल्याचे फायदे बहुगुणी आल्याचे काय आहेत फायदे

ओले आले हिवाळ्यात आणि कोरडे आले उन्हाळ्यात वापरावे जेव्हा आले हंगामात नसते. आल्याचा चहा सर्दी आणि खोकल्यासाठी फायदेशीर आहे. हिवाळ्यात बहुतेक घरांमध्ये आल्याचा वापर केला जातो. आल्याचे सेवन केल्याने शरीर अनेक आजारांपासून दूर राहते.

आले रोगप्रतिकार शक्ती मजबूत करण्यासोबतच खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास देखील मदत करते. आल्यामध्ये आढळणारे घटक खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करतात. तसेच वजन कमी करण्यास मदत होते. खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आल्याचा रस खूप फायदेशीर आहे. अद्रकामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळतात ज्यामुळे शरीरातील जळजळ कमी होते. आल्याचा रस मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फायदेशीर आहे.

रोज सकाळी आल्याचा तुकडा चघळल्याने शरीराला होतात बरेच फायदे, वाचा डॉक्टरांचा सल्ला

आल्यामध्ये कोणते पोषक घटक?

आल्यामध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट असतात. त्यात जिंजरॉल नावाचे अँटीऑक्सिडंट असते, जे जळजळ कमी करते. आल्यामध्ये व्हिटॅमिन बी ६ आणि व्हिटॅमिन सी देखील असते, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. त्यात पोटॅशियम आणि मॅग्नेशियम असते, जे रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका कमी करते.

कोलेस्ट्रॉलमुळे होणारे आजारकोलेस्ट्रॉलमुळे काय होतात त्रास

शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल वाढल्याने हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. आल्यामध्ये आढळणारे जिंजरॉल खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. आल्याचा रस प्यायल्याने ट्रायग्लिसराइड्स आणि एकूण कोलेस्टेरॉलची पातळी देखील कमी होऊ शकते. यामध्ये आढळणारे अँटीऑक्सिडंट नसांमध्ये प्लाक जमा होण्याची समस्या कमी करतात. आल्याचा रस प्यायल्याने शरीरातील पित्त रस वाढतो, ज्यामुळे कोलेस्ट्रॉलचे विघटन होते.

कधी आणि कसे प्यावे

आल्याच्या रसाचा कसा उपयोग करावा

आल्याचा रस कसा बनवायचा हे आधी आपण जाणून घेऊ. यासाठी २-३ इंच आल्याचा तुकडा ठेचून किंवा किसून घ्या. आले मिक्सरमध्येही बारीक करू शकता. आता आले एका मलमलच्या कपड्यात घालून घट्ट पिळून घ्या. आल्याचा रस कडू असतो, त्यामुळे त्याची चव सुधारण्यासाठी तुम्ही त्यात थोडे मध आणि लिंबू घालू शकता. हा रस सकाळी रिकाम्या पोटी पिणे फायदेशीर ठरेल. आपल्याला फक्त १-२ चमचे रसाने सुरुवात करावी लागेल.

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# हॉटेल सारखा 'सरसों का साग' घरी कसा बनवायचा? जाणून घ्या सिंपल रेसिपी

हिवाळ्याच्या थंडीत सरसों दा साग आणि मक्याची रोटी खाण्याची मजाच वेगळी! हे चवीबरोबरच आरोग्यालाही अनेक फायदे मिळवून देत असते. याला बनवण्याची योग्य पद्धत जाणून घ्या.

हिवाळ्यात हिरव्या पालेभाज्या मुबलक प्रमाणात उपलब्ध होतात. सरसों का साग आणि मक्याची भाकरी हे हिवाळ्यातील खास पदार्थ आहेत. हिवाळ्याच्या हंगामात तुम्ही सरसों का साग तयार करून खाल्लयास याचा तुमचा आरोग्याला फार फायदा होईल. बऱ्याच लोकांना उत्कृष्ट सरसों का साग कसे बनवायचे हे माहित नसते. हा पदार्थ हॉटेल मध्येही उपलब्ध असतो. हॉटेल मध्ये तुम्ही हा पदार्थ कधी ना कधी खाल्ला असावाच. भारतीय पदार्थांतील हा एक लोकप्रिय पदार्थ आहे मात्र तुम्ही जर अजून या पदार्थाची चव चाखली नसेल तर तुम्ही आयुष्यातून फार मोठी गोष्ट चुकवत आहात.

आम्ही तुम्हाला सांगतो की, सरसों का साग ही पंजाब राज्याची एक फेमस डिश आहे. अनेकजण घरी सरसों का साग ही भाजी बनवायला पाहतात मात्र त्यांना यात हवी तशी चव मिळत नाही . याचे मुख्य कारण म्हणजे साग तयार करण्याची पद्धत. आज आम्ही तुम्हाला हॉटेल सारखा परफेक्ट घरी कसा तयार करायचा याची एक योग्य पद्धत सांगत आहोत. हा पदार्थ चवीबरोबरच आरोग्यासाठीही फायद्याचा ठरतो ज्यामुळे हिवाळ्यात एकदा तरी याची सेवन जरूर करा. चला तर मग जाणून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.



रेसिपीच्या बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

साहित्य

सरसोची पाने (मोहरीची पाने) – ५०० ग्रॅम

पालक पाने – २५० ग्रॅम

बथुआची पाने (कोकराची पाने) – १०० ग्रॅम

पाणी – २ कप

लसूण– ५०ग्रॅम

तूप – ३० ग्रॅम

लसूण (ठेचून) – ३० ग्रॅम

आले (किसलेले) – ५०ग्रॅम

गव्हाचे पीठ

मीठ – चवीनुसार

रेसिपीच्या बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

कृती

सरसों चा साग बनवण्यासाठी सर्वप्रथम मोहरी, पालक आणि बथुआची पाने स्वछ धुवून घ्या

यानंतर पाने बारीक चिरून घ्या आणि एका मोठ्या भांड्यात काढा

आता पालेभाज्या कढईत किंवा कुकरमध्ये ठेवा आणि ते उकडून शिजवा

यांनतर यात सागात १ कप पाणी घालून मध्यम आचेवर शिजू द्या

हिरव्या भाज्या शिजवताना त्यात मीठ आणि चिमूटभर हळद घाला

जेव्हा हिरव्या भाज्या मऊ होतात आणि चांगल्या शिजल्या जातात तेव्हा एका भांड्यात १–२ चमचे गव्हाचे पीठ किंवा कोणतेही कॉर्न किंवा बाजरीचे पीठ घ्या

आता या पिठात पाणी घालून द्रावण तयार करा, त्यात १ चिमूट हिंग घाला आणि हिरव्या भाज्यांमध्ये पिठाचे द्रावण

घाला आणि ढवळत असताना शिजवा, हे हिरव्या भाज्यांमध्ये गुळगुळीतपणा जोडेल

हिरव्या भाज्या नीट मिसळून शिजल्या की गॅस बंद करा

आता एका पातेल्यात देशी तूप घाला. त्यात जिरे, १ चिमूट हिंग, ८–१० पाकळ्या लसूण बारीक चिरून, २ लाल

मिरच्या घालून शिजवून घ्या

शेवटी यामध्ये १ चमचा काश्मिरी लाल मिरची घाला आणि मग तयार फोडणीत हिरव्या भाज्या घाला

आता फोडणीसह हिरव्या भाज्या थोडे शिजवा आणि हिरव्या भाज्या चांगल्या शिजल्यावर सर्व्ह करताना वरून अर्धा चमचा बटर घाला

ही भाजी बाजरी आणि मक्याच्या भाकरीसोबत खाण्यासाठी सर्व्ह करा

---

## थंडीमुळे त्वचेवर आलेल्या सुरकुत्या, टॅनिंग घालवण्यासाठी 'या' पद्धतीने करा तुपाचा वापर, त्वचा होईल तेजस्वी

हिवाळ्यात त्वचेवर आलेल्या सुरकुत्या, कोरडी त्वचा आणि टॅनिंग घालवण्यासाठी तुपाचा वापर करा. त्वचेसाठी तूप अतिशय प्रभावी आहे. त्वचेवर तूप लावल्यामुळे त्वचा हायड्रेट आणि निरोगी राहण्यास मदत होते.

राज्यभरात सगळीकडे थंडी वाढू लागली आहे. थंडी वाढल्यानंतर त्वचा आणि केसांसंबधित अनेक समस्या उद्भवू लागतात. थंडीच्या दिवसांमध्ये त्वचा कोरडी पडणे, रुक्ष आणि निस्तेज होऊन जाते. शिवाय या दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर केस गळू लागतात. त्वचा कोरडी पडल्यानंतर कितीही मेकअप केला किंवा इतर कोणतेही महागतले प्रॉडक्ट वापरले तरीसुद्धा त्वचा खराब दिसू लागते. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये त्वचेची योग्य ती काळजी घ्यावी. थंडी चालू झाल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आहारात बदल, स्किन केअर, पौष्टिक पदार्थांचे सेवन इत्यादी गोष्टी फॉलो कराव्यात.(फोटो सौजन्य–)

स्किन केअर संबंधित बातम्यांसाठी इथे क्लिक करा

थंडीच्या दिवसांमध्ये त्वचेमधील ओलावा कायम टिकवून ठेवण्यासाठी मॉईश्चरायजर लावणे आवश्यक आहे. त्वचेला सूट होईल असे मॉईश्चरायजर लावावे, ज्यामुळे त्वचा तुकतुकीत राहील. हिवाळ्यात तुम्ही मॉईश्चरायजर म्हणून तुपाचा वापर करू शकता. तुपामध्ये असलेले गुणधर्म त्वचा सुंदर आणि चमकदार ठेवण्यासाठी मदत करतात. त्वचेला तूप लावल्यामुळे चेहऱ्यात हळूहळू बदल जाणवू लागतो. पण जास्त तेलकट त्वचा असलेल्या महिलांनी चेहऱ्यावर तूप लावू नये. तूप लावल्यामुळे त्वचा आणखीन तेलकट होण्याची शक्यता असते. तूप लावून त्वचेवर मसाज केल्यास रक्तभिसरण सुधारते आणि त्वचेचा रंग हळूहळू बदलू लागतो.

तूप आणि मध:

हिवाळ्यात सुंदर आणि चमकदार त्वचा मिळवण्यासाठी तुपामध्ये तुम्ही मध मिक्स करून लावू शकता. यामुळे हायड्रेट राहील. शिवाय त्वचेमधील नैसर्गिक ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आहारात तुपाचे सेवन करावे, वाटीमध्ये अर्धा चमचा तूप घेऊन त्यात थोडेसे मध मिक्स करून संपूर्ण त्वचेवर लावा. १० ते १५ मिनिटं ठेवल्यानंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवा आणि त्यानंतर फेसवॉश वापरून पुन्हा एकदा त्वचा स्वच्छ करा. यामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी होतील.

तूप आणि बेसन:

त्वचा रंग उजळवण्यासाठी बेसन अतिशय प्रभावी आहे. वाटीमध्ये तूप घेऊन त्यात बेसन घेऊन मिक्स करून घ्या. तयार पेस्ट त्वचेवर लावून काहीवेळ सुकण्यासाठी ठेवा. यामुळे त्वचेचा रंग उजळून टॅनिंगची समस्या कमी होईल. चेहरा व्यवस्थित सुकल्यानंतर कोमट पाण्याने त्वचा धुवून घ्या. हा उपाय केल्यामुळे त्वचेवरील सुरकुत्या कमी होतील आणि त्वचा चमकदार दिसू लागेल.

स्किन केअर संबंधित बातम्यांसाठी इथे क्लिक करा

तूप आणि मुलतानी:

टॅनिंगच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी वाटीमध्ये तूप घेऊन त्यात मुलतानी माती मिक्स करा. मुलतानी माती त्वचेची गुणवत्ता सुधारण्यासाठी मदत करते.

## कौरव पांडव फुलामध्ये महाभारत आणि ट्रिनिटी आहे, श्री कृष्णाच्या सुदर्शन चक्रासारखे हे फूल लावा घरी

हे फूल पाहून तुम्हालाही धक्का बसेल. खरे तर ब्रह्मा विष्णू महेशासह संपूर्ण महाभारत एकाच फुलात सामावलेले आहे. असे म्हटले जाते की त्याला १०८ अवयव आहेत.

कौरव पांडव फुलाचे नाव ऐकताच त्याचा महाभारताशी संबंध असल्याचे समजेल. पण, जेव्हा तुम्हाला या फुलात महाभारत दिसेल तेव्हा तुम्हाला आश्चर्य वाटेल. होय, असे घडते आणि हे विशेष फूल तुम्ही तुमच्या घरात अगदी सहज लावू शकता जे तुमच्या घराचे सौंदर्य वाढवेल.

कौरव पांडव फूल ज्याला इंग्रजीत पॅशन फ्लॉवर म्हणतात. हे फूल केवळ त्याच्या सौंदर्यासाठीच नाही तर त्याच्या वैशिष्ट्यासाठीही ओळखले जाते. कौरव पांडवांच्या फुलात संपूर्ण महाभारत सामावलेले आहे असे म्हणतात. कारण या फुलाला १०० जांभळी पाने आहेत जी कौरवांचे प्रतीक आहेत. तर पाकळ्यांच्या वर ५ हिरव्या बिया असतात, ज्यांना पांडव म्हणतात.



एवढेच नाही, तर या एका फुलात महाभारतासह ब्रह्मा विष्णू महेश यांचाही समावेश आहे. वास्तविक, फुलामध्ये तीन लहान शरीरे आहेत जी ट्रिनिटीचे प्रतीक आहेत. फुलाचा मधला भाग श्रीकृष्णाच्या विश्वाचे प्रतीक मानला जातो. आणि हे फूल श्रीकृष्णाच्या सुदर्शन चक्रासारखे दिसते. त्याची सर्व खास वैशिष्ट्ये जाणून घेतल्यावर, तुम्हाला हे फूल पाहिल्यासारखेच नाही तर ते तुमच्या घरात लावावेसे वाटेल. म्हणून आम्ही तुम्हाला कौरव पांडव फुल वाढवण्याचा मार्ग सांगत आहोत.

झाड कधी आणि कुठे लावायचे

कौरव पांडव फुलांची लागवड करण्यासाठी ऑगस्ट ते ऑक्टोबर हा सर्वोत्तम महिना मानला जातो, जरी आपण ते नोव्हेंबरमध्ये देखील लावू शकता. फेब्रुवारी ते मार्चमध्ये फुले येण्यास सुरुवात होते. आपण इच्छित असल्यास, आपण हे फूल बागेत किंवा मोठ्या कंटेनर आणि भांडीमध्ये देखील वाढवू शकता. तथापि, किमान ६ तास सूर्यप्रकाश असेल अशी जागा निवडा. आपण इच्छित असल्यास, आपण ते एका कोपऱ्यात ठेवू शकता आणि सजावट म्हणून रेलिंगवर टेंड्रिल्स माउंट करू शकता.

रोपासाठी माती तयार करा

वनस्पती वाढवण्यासाठी, आपल्याला प्रथम माती तयार करावी लागेल. जर ते जमिनीत लावायचे असेल तर मातीशिवाय शेणखत आणि मूठभर कडुलिंबाची पूड घालावी. तर कंटेनर किंवा भांड्यांसाठी १:१:१:१ च्या प्रमाणात माती, कंपोस्ट, कोको पीट आणि कंपोस्ट यांचे प्रमाणिक मिश्रण वापरावे.

अशा प्रकारे बियाणे लावा

माती तयार झाल्यानंतर, आपल्याला बियाणे आवश्यक आहे. त्यासाठी बाजारातून फळ आणावे लागेल. आता लगदा बाहेर काढून नीट धुवा, म्हणजे फक्त मधोमध राहील. आपल्याला बियाणे एका भांड्यात किंवा कंटेनरमध्ये ३ ते ४ इंच खोलवर लावावे लागेल. ते मातीने झाकून ते पाण्याने ओले करा.

वनस्पतीची काळजी घेणे महत्त्वाचे आहे

१० दिवसात, कौरव पांडव वनस्पतीच्या बिया उगवू लागतील. या झाडाला जशी सूर्यप्रकाशाची जास्त गरज असते, तशीच तुम्हाला पाणी देण्याचीही काळजी घ्यावी लागेल. वेळोवेळी खत घालत राहा जेणेकरून झाडाला पोषणाची कमतरता भासू नये. याशिवाय कीटकांपासून बचाव करण्यासाठी तुम्ही कडुलिंबाच्या तेलाची फवारणी करू शकता.

---

# कार्यकर्त्यांच्या कष्टाचा; लाडक्या बहिणीच्या आशीर्वादाचा विजय – आ.रमेशआप्पा कराड









लातूर :– लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तब्बल वीस वर्ष मेहनत घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या कष्टाचा, धनशक्ती विरुद्ध जनशक्तीचा विजय आहे या विजयाला लाडक्या बहिणीचा मोठा आशीर्वाद मिळाला असल्याचे सांगून नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना हा विजय समर्पित करतो अशी भावना व्यक्त केली.

गेल्या वीस वर्षापासून गोरगरीब सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जनतेच्या न्याय हक्कासाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात सातत्याने संघर्ष केला संघर्षाच्या या लढाईत प्रत्येक वेळी कार्यकर्त्यांनी साथ दिली. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपाचे काम केले. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात दोन वेळा पराभूत झालो असलो तरी कधीच निराश झालो नाही ज्या दिवशी पराभूत झालो त्या दिवसापासूनच त्या दिवसापासून पुन्हा त्याच जिद्दीने कामाला लागलो. सर्वसामान्यांच्या कार्यात कार्यरत राहिलो, गोरगरिबांना मदत केली, सुखदुःखात सहभागी झालो. आरोग्याची सेवा दिली अध्यात्मिक क्षेत्र टिकून राहावे यासाठी भजनाचे साहित्य वाटप केले या सगळ्या सामाजिक, आध्यात्मिक आणि राजकीय कामात सर्व सामान्य कार्यकर्त्यांनी मला वेळोवेळी साथ दिली.

पक्षाने दिलेल्या आमदारकीचा उपयोग गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी केला असे सांगून रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या विधानसभा निवडणुकीत पराभवाच्या भीतीनेच भ्रष्ट पैशाच्या जोरावर मतदारसंघाला विकत घेण्याची पाप केले याची सर्वसामान्य मतदारांना मोठी चीड होती त्यामुळे ही निवडणूक मतदारांनीच हाती घेऊन माझ्या विजयाचा निर्धार केला होता.

लातूर ग्रामीण मतदार संघातील निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती यांच्यातच अत्यंत चुरशीची लढत झाली यात जनशक्तीचा विजय झाला. आज पर्यंत केलेल्या कामामुळे गोरगरीब सर्वसामान्य मतदारांनी या निवडणुकीत साथ दिली राज्यातील महायुती शासनाने राबवलेल्या विविध कल्याणकारी योजनेच्या लाभार्थ्यांनी आशीर्वाद दिले. हा विजय खऱ्या अर्थाने लाडकी बहीणीचा आणि गेली २० वर्ष मेहनत घेतलेल्या कष्ट वेचलेल्या माझ्या सहकाऱ्यांचा, कार्यकर्त्यांचा आहे असे सांगून लोकनेते सूर्य गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना माझा हा विजय समर्पित करतो अशी भावना आ. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.

# आ.पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक आम्ही जिंकलो- नमिताताई मुंदडा

## अटीतटीच्या लढतीत अखेर नमिताताई मुंदडा विजयी




केज / प्रतिनिधी - विधानसभा मतदार संघाची निवडणूक अत्यंत चुरशीची आणि रोमांचक अशी झाली. शेवटच्या क्षणापर्यंत चाललेल्या या लढतीत अखेर नमिताताई मुंदडा यांनी बाजी मारली.केज विधानसभा मतदार संघात नमिताताई मुंदडा आणि पृथ्वीराज साठे यांच्या दोघात खरी लढत पाहायला मिळाली. नमिताताई अक्षय मुंदडा भारतीय जनता पार्टी १,१७,०८१ मते मिळाली तर पृथ्वीराज शिवाजी साठे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) यांना १,१४,३९४ मते मिळाली. ईतर २२ लहान मोठे उमेदवार १६,५८५ मते मिळाली आहेत.त्यामध्ये महायुतीच्या उमेदवार नमिताताई अक्षय मुंदडा २६८७ मतांनी विजयी घोषित करण्यात आले. आमदार पंकजाताई मुंडे व प्रीतमताई यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक आम्ही जिंकलो आहोत अशा प्रतिक्रिया आमदार नमिताताई मुंदडा यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिल्या. यावेळी बोलताना नमिताताई म्हणाल्या की, गेल्या पाच वर्षात जो विकास मी केला आहे. त्यापेक्षाही जास्त यावेळेस आपल्या मतदारसंघात विकास कामे करण्यासाठी मी प्रयत्नशिल राहील अशी माहिती माध्यमाशी बोलताना दिली आहे. तसेच अक्षय भैय्या मुंदडा यांनी बोलताना विरोधकानी अक्षय मुंदडा यांना प्रत्येक भाषणात विरोधकाने पिल्याची उपमा दिली यामुळे आज अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, या पिल्याने ही विधानसभा जिंकली आहे यापुढे या मतदारसंघाचा विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत येथुन पुढे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसाठी आजपासून तयारीला लागलो आहोत असे मत व्यक्त केले व ज्यां लोकांना आम्ही मोठ केल त्यांना वाटत होते की,आम्ही लई ताकतवार आहोत त्यांना जनतेने जागा दाखवली असे आमच्या प्रतिनिधींशी बोलताना स्पष्ट केले. यावेळी कार्यकर्त्यांनी रॅली काढून आनंद उत्सव साजरा केला यामध्ये असंख्य कार्यकर्ते सामील झाले होते.

# पोलिसांचा पक्षपातीपणा; खा.सोनवणेंकडून 'त्या' हल्लेखोरांच्या अटकेची मागणी पोलीस अधिक्षकांना केले अवाहन

केज/प्रतिनिधी- परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जी-वघेणा हल्ला करण्यात आला. पोलीसांसमोर हल्ला होऊनही गुन्हा दाखल केला नसून पोलिसांकडून पक्षपातीपणा सुरू आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करून हल्लेखोरोंना अटक करावी, असे अवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी पोलिस अधिक्षकांना केले आहे. प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. याच परिसरात उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सुरक्षा रक्षकांनाही हल्लेखोरांकडून दमदाटी करण्यात आली. हा प्रकार पोलीस यंत्रणेसमोर घडूनही अद्यापपर्यंत हल्लेखोरांवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. उलट, आकसापोटी उमेदवारांच्या नातेवाईकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. हा पक्षपातीपणा खपवून घेतला जाणार नाही. बीड पोलीस अधीक्षक यांना



माझे आवाहन आहे, ड.माधव जाधव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी. अन्यथा, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, व त्याच्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी पोलीस अधीक्षकांवर असेल, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. शिवाय परळीत मतदान सुरू असताना अनेक ठिकाणी मतदारांनाही दमदाटी करण्याचे प्रकार घडले असून पोलीसांच्या अंगावरही विरोधकांचे कार्यकर्ते धा-वून गेलेले आहेत. असे असताना पोलीसही शांत आहेत. येणाऱ्या काळात हे असेच वाढत जाऊन लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी बघ्याची भुमीका न घेता दोषींवर निप-क्षपातीपणे कारवाई करावी, असेही म्हटले आहे.

# 'माझे परममित्र देवेंद्रजी फडणवीस...', दणदणीत विजयानंतर मोदींनी केले अभिनंदन

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या मोठ्या यशाने भाजपमध्ये आनंदाची लाट आहे. दरम्यान, या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भाजप मुख्यालयातून महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले.

'महाराष्ट्रात सुशासनाचा, सत्याचा विजय झाला आहे. देशात अन्य ठिकाणी देखील पोटनिवडणुका झाल्या. सर्वच राज्यांत भाजपाला मोठे यश मिळाले आहे. देश फक्त आणि फक्त विकासाची मागणी करत आहे. मी देशाच्या जनतेचे आभार मानतो,' असं मोदी म्हणाले.

महाराष्ट्रातील विजयाबद्दल बोलताना पीएम मोदी म्हणतात, 'महाराष्ट्रात सुशासनाचा विजय झाला आहे. महाराष्ट्रात खऱ्या सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. आज महाराष्ट्रात लबाडी आणि फसवणूक पूर्णपणे पराभूत झाली आहे. राज्यात विकासाचा विजय झाला आहे. मी एकनाथ शिंदे, माझे परममित्र देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे अभिनंदन करतो. आज अनेक राज्यांतील पोटनिवडणुकांचे निकालही आले आहेत. आमची लोकसभेची जागाही एकाने वाढली आहे. यूपी, उत्तराखंड आणि राजस्थानमध्ये लोकांनी भाजपला जोरदार पाठिंबा दिला आहे. आसामच्या जनतेने पुन्हा एकदा भाजपवर विश्वास व्यक्त केला आहे. मध्य प्रदेशातही आम्हाला यश मिळाले आहे. बिहारमध्येही एनडीएचा पाठिंबा वाढला आहे. देशाला आता फक्त विकास हवा आहे, हे यावरून दिसून येते. महाराष्ट्रातील मतदार, माता, भगिनी आणि युवक, शेतकरी बंधू-भगिनी आणि देशातील जनतेला मी आदरपूर्वक वंदन करतो.'

महाराष्ट्राने सर्व विक्रम मोडले

'महाराष्ट्राने सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. कोणत्याही पक्षाचा किंवा आघाडीचा गेल्या ५० वर्षांतील हा सर्वात मोठा विजय आहे. सलग तिसऱ्यांदा महाराष्ट्राने भाजपच्या नेतृत्वाखाली आघाडीला आशीर्वाद देऊन विजयी केले आहे. महाराष्ट्रात भाजप हा सलग तिसऱ्यांदा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. हे निश्चितच ऐतिहासिक आहे. भाजपच्या शासनप्रणालीवर हा शिक्कामोर्तब आहे. महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेस आणि त्यांच्या सर्व मित्रपक्षांपेक्षा एकट्या भाजपला जास्त जागा दिल्या आहेत. यावरून असे दिसून येते की, सुशासनाचा विचार केला तर देशाचा विश्वास फक्त भाजप आणि एनडीएवर आहे,' असंही मोदी यावेळी म्हणाले.

सलग तिसऱ्यांदा भाजपला जनादेश

'सलग तीन वेळा भाजपला जनादेश देणारे महाराष्ट्र हे देशातील सहावे राज्य आहे. याआधी आम्ही गोवा, गुजरात, छत्तीसगड, हरियाणा आणि मध्य प्रदेशात सलग तीन वेळा विजय मिळवला आणि बिहारमध्येही एनडीएला सलग तीन वेळा जनादेश मिळाला आहे.

# किनवटमध्ये महायुतीचे भीमराव केराम यांचा दुसऱ्यांदा विजय

## माजी आ. प्रदीप नाईक पराभूत,भीमराव केराम यांना मंत्रीपदाची संधी मिळणार का?

किनवट/शेख शौकत :-८३ किनवट विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचे निकाल २३ नोव्हेंबर रोजी घोषित झाले असून महायुतीचे उमेदवार भीमराव केराम यांनी ९२०२८ इतके मतदान घेऊन दुसऱ्यांदा ऐतिहासिक विजय मिळविला आहे.या विजयाचा सर्वत्र जल्लोष साजरा करण्यात आला असून यावेळेला महायुतीसरकार मध्ये भीमराव केराम यांना मंत्रीपद मिळणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. ८३ किनवट विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान संपन्न झाले असून दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी किनवट येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण झाली सकाळी ७ वाजता मतमोजणीला प्रारंभ झाला सायंकाळी पाच वाजेपर्यंत एकूण १४ टेबलवर २४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी प्रक्रिया झाली या वेळेला एकूण १७उमेदवार रिंगणात होते महायुतीचे भीमराव केराम



व महाविकास आघाडीचे प्रदीप नाईक यांच्यात तुल्यबळ लढत झाली. चौदाव्या फेरीपर्यंत प्रदीप नाईक आघाडीवर होते त्यानंतर त्यांची पीछेहाट सुरू झाली ती अंतिम फेरीपर्यंत कायम राहिली.पाच वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालावरून भीमराव केराम यांना ९२०२८ मते तर त्यांचे प्रतिस्पर्धी प्रदीप नाईक यांना ८६३७९ इतकी मते मिळाली.चूरशीच्या लढतीत भीमराव केराम हे ५६४९ इतके मताधिक्य घेऊन विजयी झाले.प्रचाराच्या रणधुमाळीत सर्वत्र तुतारीची चर्चा झाली असली तरी निकालात मात्र कमळाने बाजी मारली असून किनवट विधानसभेतील भीमराव केराम यांचा हा दुसरा विजय आहे.या विजयानंतर महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिकांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर एकच जल्लोष साजरा केला तर किनवट शहरा-तील प्रमुख चौकात फटाक्यांची जोरद-ार आतिषबाजी करण्यात आली या निवडणुकीत माजी आमदार प्रदीप नाईक यांनी आपली संपूर्ण राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली होती परंतु तुल्यबळ लढतीत त्यांना पराभव पत्करावा लागला. किनवट विधानसभेसह महाराष्ट्र राज्यात महायुतीने एकतर्फी विजय प्राप्त केला असून महायुतीच्या मंत्रिमंडळात किनवटचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रीपदाची संधी मिळणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. किनवट विधानसभा मतदारसंघ हा आदिवासी, दुर्गम मागास म्हणून ओळखला जातो या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भीमराव केराम यांना मंत्रिपद मिळणार का याकडे सर्वांचेच लक्ष लागून आहे.

# काही लोकांनी दगाफटका करून अस्थिरता निर्माण केली, पण महाराष्ट्राने शिक्षा दिली; मोदींचा घणाघात

महाराष्ट्रात विभाजनवादी शक्तींचा पराभव. मी एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची स्तुती करतो. महाराष्ट्रात सुशासनाचा, सत्याचा विजय झाला आहे. देशात अन्य ठिकाणी देखील पोटनिवडणुका झाल्या.

सर्वच राज्यांत भाजपाला मोठे यश मिळाले आहे. देश फक्त आणि फक्त विकासाची मागणी करत आहे. मी देशाच्या जनतेला नमस्कार करतो. मी झारखंडच्या जनतेलाही नमस्कार करतो. झारखंडच्या वेगाने विकास करण्यासाठी आम्ही आणखी ताकदीने काम करणार. भाजपाचा एकेक कार्यकर्ता काम करणार, असल्याचे मोदी यांनी सांगितले.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राने तुष्टीकरणाचा सामना कसा करायचा हे आज दाखवून दिले. शाहू महाराज, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर, बाळासाहेब ठाकरे अशा महान व्यक्तीमत्वांच्या भूमीने जुने सर्व रेकॉर्ड तोडले आहेत. गेल्या ५० वर्षांत कोणत्याही पक्षाला किंवा कोणत्याही आघाडी-युतीसाठी हा सर्वात मोठा विजय आहे, असे मोदी म्हणाले.

सतत तिसऱ्यांदा भाजपाच्या नेतृत्वात कोणत्या युतीला विजयी केले. तसेच भाजपा महाराष्ट्रात सर्वात मोठा पक्ष बनण्याची सलग तिसरी वेळ आहे. महाराष्ट्र देशातील सहावे राज्य आहे ज्याने भाजपाला सतत तीनवेळा जनादेश दिला आहे. यापूर्वी गोवा, गुजरात, छत्तीसगढ, हरियाणा आणि मध्य प्रदेशात सतत तीनवेळा जिंकलो आहोत. बिहारमध्येही एनडीएला तीनवेळा जनादेश मिळाला आहे. आणि ६० वर्षांनी तुम्ही मला तिसऱ्यांदा संधी दिली, असे मोदी म्हणाले.

या जनतेची सेवा करण्यात कोणतीही कसर बाकी ठेवली जाणार नाही. सतत तिसऱ्यांदा स्थिरतेला निवडणे महाराष्ट्राच्या जनतेच्या सामंजस्यातून दिसते. मध्ये काही लोकांनी धोकेबाजी करून अस्थिरता निर्माण केली. महाराष्ट्राने त्यांना नाकारले आहे. त्याची शिक्षा त्यांना संधी मिळताच जनतेने दिली आहे. या जनतेने जे दिलेय ते विकसित भारतासाठी मोठा आधार ठरणार आहे. हरियाणानंतर महाराष्ट्राच्या जनतेने एकजुटतेचा संदेश दिला आहे, असे मोदी म्हणाले.

काँग्रेस आणि त्यांच्या साथीदारांच्या कटाला या राज्याने एक है तो सेफ हैने उत्तर दिले. जाती धर्म भाषा आणि क्षेत्राच्या नावावर लढविणाऱ्या लोकांना चांगला धडा शिकविला आहे. आदिवासींनी, ओबीसी, दलितांनी भाजपाला मतदान केले. आमच्या सरकारने मराठीला सांस्कृतीक भाषेचा दर्जा दिला. मातृभाषेचा सन्मान आमच्या संस्कारात आहे, असे मोदी म्हणाले.

# शरद पवारांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग; पुणे जिल्ह्यात अवघ्या एका जागेवर तुतारी वाजली, दिग्गज पराभूत!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा आज लागलेला निकाल हा राज्याच्या राजकारणाला वेगळी दिशा देणारा ठरला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षांचे मजबूत समजले जाणारे अनेक बालेकिल्ले आजच्या निकालातून उद्ध्वस्त झाले आहेत.

पुणे जिल्हा हा पारंपरिकदृष्ट्या शरद पवार यांचा गड मानला जात होता. मात्र अजित पवार यांच्या बंडामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आणि राष्ट्रवादीचे दोन तुकडे झाले. या फुटीचे प्रतिबिंब आजच्या निकालातून दिसून आले आहे. पुणे जिल्ह्यातील अवघ्या एका मतदारसंघात शरद पवारांच्या नेतृत्वाखालील पक्षाला यश मिळालं आहे.

शरद पवार यांच्या पक्षाच्या अनेक दिग्गज नेत्यांना पुणे जिल्ह्यात पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. फक्त वडगाव शेरी या मतदारसंघातून बापू पठारे यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या सुनील टिंगरे यांचा पराभव करत विजयाची तुतारी वाजवली. अन्यथा बारामतीतून शरद पवारांच्या पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार, इंदापुरातून हर्षवर्धन पाटील, शिरूरमधून हर्षवर्धन पाटील, जुन्नरमधून सत्यशील शेरकर, आंबेगावातून देवदत्त निकम, हडपसरमधून प्रशांत जगताप, खडकवासल्यातून सचिन दोडके यांच्यासह अन्य उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला.

शरद पवार यांनी अजित पवारांसोबत गेलेल्या उमेदवारांच्या पराभवाचा चंग बांधला होता. या उमेदवारांना पाडा, पाडा, पाडा म्हणत पवारांनी रान पेटवलं होतं. मात्र लाडकी बहीण योजनेसह राज्य सरकारच्या अन्य योजनांच्या बळावर सत्ताधारी महायुतीच्या बाजूने चमत्कार झाल्याचं दिसत आहे.

दरम्यान, पुणे जिल्ह्यातून काँग्रेसचीही मोठी पीछेहाट झाली आहे. भोर-वेल्हा-मुळशी या मतदारसंघातून संग्राम थोपटे, पुरंदरमधून संजय जगताप, कसब्यातून रवींद्र धंगेकर या काँग्रेसच्या विद्यमान आमदारांच्या पदरी पराभव आला आहे.

# 'मला पाडण्याची रणनीती....'; गुलाल लागताच भाजपच्या सुरेश धसांकडून पंकजा मुंडेंवर निशाणा

आष्टी : मागील ३५ वर्षांपासून मी राजकारणात असून, २० वर्षे आमदारकी भोगली आहे. मी लोकसभा निवडणुकीत माझ्या समाजाचा रोष पत्करून प्रामाणिकपणे काम केले आणि आत्ता विधानसभेच्या निवडणुकीत तुम्ही माझा प्रचार कसा केला, हे मी नाही तर संपूर्ण मतदारसंघाने पाहिले.

मतदारसंघाने इमानदारी जपली, पण तुम्ही नाही. आजपासून तुम्ही राजकारणातला सहकारी गमावल्याची भावना भाजपचे सुरेश धस यांनी आ. पंकजा मुंडे यांच्याबद्दल व्यक्त केली, तसेच त्यांनी अपक्ष भीमराव धोंडे यांना मदत केल्याची टीकाही केली.

आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत आज ७७ हजार ९७५ मतांनी सुरेश धस यांनी विजय मिळवल्यानंतर आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शनिवारी सायंकाळी ५ विजयी सभा झाली. यावेळी धस म्हणाले, आज मला मतदारसंघातील जनतेने पाचव्यांदा आमदार म्हणून प्रचंड मताने विजय करून काम करण्याची संधी दिली. मी माझ्या राजकीय जीवनात कधीच जातीयवाद केला नाही आणि तुम्ही स्व. गोपीनाथ मुंडे यांची कन्या असूनही त्यांच्या राजकारणात कधीच त्यांनी असे लेच्या- पेच्याचे राजकारण केले नाही; पण तुम्ही कुणाच्या तरी सांगण्यावरून आम्हाला निवडणुकीत पाडण्यासाठी रणनीती आखता हे वागणे चांगले नाही, असा इशाराही पंकजा मुंडे यांना दिला.

यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यावर तोफ डागत धोंडे साहेब आपण संस्थानिक आहात, पण तुमचे कायधंदे सुरू आहेत, हे सगळ्यांना माहीत आहे, तसेच आता त्यांच्या संस्थेतील शिक्षकांना त्रास होणार नाही, तर राष्ट्रवादीचे उमेदवार बाळासाहेब आजबे यांच्यावर टीका करताना धस म्हणाले, हे रनिंग आमदार सभेत मला म्हणतात, खोडावर घाव घालतो. आरे चांगली कुऱ्हाड घेऊन शेतातील झाडाच्या खोडावर घाव घालत बसा, कारण तुमची क्षमता मतदारसंघाने आजच्या निकालात पाहिली असल्याचे त्यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE